Impact Factor – 6.261

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

July-August-September 2019

Vol. 6 Issue 3

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchiournev.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

| | | | |
|---|---|---|---|
| 55 | पूर्व विदर्भातील टसर रेशीम उद्योगाच्या उत्पादनाची बाजारपेठ व व्यापार | हरिश्चंद्र कैताडे | 266 |
| 56 | आपत्ती व्यवस्थापनातील राजकारण | श्री. संदिप वारुळे | 275 |
| 57 | मराठा तितुका मेळवावा - महाराष्ट्र धर्म वाढवावा | डॉ.अलका बडगे | 280 |
| 58 | ऊसतोड महिला कामगार आणि शासकिय धोरण | प्रा.महादेव चुंचे | 285 |
| 59 | निरीक्षणगृहातील मुलांच्या समस्या व शासनाची भूमिका | प्रा.अशोक सातपुते | 289 |
| 60 | सत्य आणि अनुरुपतावादी उपपत्ती : एक समीक्षा | डॉ.राजेसाहेब मारडकर आणि प्रा.मोनालिसा खानोरकर | 293 |
| 61 | महाराष्ट्र पोलीस दलाचा विकास आणि प्रशासकीय रचना-एक अध्ययन | प्रा. एन.आर. हुरगुळे व डॉ. आर.एम. भिसे | 298 |
| 62 | उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा त्यांचा शैक्षणिक संपादनावर होणारा परिणाम- एक अभ्यास | प्रीती डांगे | 305 |
| 63 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य विचाराची प्रासंगिकता | डॉ.संजय शिंदे | 311 |
| 64 | भाषा, साहित्य आणि यशवंतरावजी चव्हाण | डॉ.सुषमा प्रधान | 314 |
| 65 | भारतातील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया : एक अभ्यास | डॉ. कल्याण मोरे व प्रा. अरविंद पाटील | 318 |
| 66 | भारतीय स्त्री जीवनाचा चिकित्सक अभ्यास | डॉ.म.सु.पगारे, श्रीमती व्ही.आर.भोकरीकर | 322 |
| 67 | पुणे जिल्ह्यातील इंदापूर जलयुक्त शिवार अभियानाचा चिकित्सक अभ्यास | डॉ. तेजश्री हुंबे | 333 |
| 68 | दलित कादंबरीतील जीवनचित्रण | डॉ. बाबाराव ठावरी | 340 |
| 69 | लोकदैवत कथेतील प्रतिकात्मकता | डॉ.राजेंद्र पाटील | 345 |
| 70 | पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचे सामाजिक कार्य | डॉ.गजानन सोडनर | 348 |
| 71 | बंजारा गोत्रसंघटना, बंजारा गोत्रप्रतिक वाद | डॉ. राजेंद्र वाटाणे, कु.मनाली राठोड | 353 |
| 72 | प्रवासवर्णन – एक ललित साहित्य प्रकार | डॉ.नामदेव माळी | 357 |
| 73 | दलित कवितेची पूर्वपरंपरा | डॉ.राष्ट्रपाल मेश्राम | 361 |
| 74 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद : राष्ट्रावादापुढील आव्हाने आणि कार्यनीती | डॉ.सुशांत चिमणकर | 370 |
| 75 | प्राचीन जीवनातील लोककथा | डॉ.माधुरी पाटील | 383 |
| 76 | डॉ. कुंडलिक शिंदे लिखित 'समर्पित जीवनाचे आदर्श' मधील व्यक्तिचित्राचे वाङ्मयीन मूल्यमापन | डॉ.गुंफा कोकाटे | 387 |
| 77 | संत तुकाराम व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील सामाजिक जाणिवांचा तौलनिक अभ्यास | प्रा.मनोज ढोणे | 402 |
| 78 | 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' : जीवन संघर्षाची कहाणी | प्रा. विनोद भालेराव | 406 |
| 79 | 'म्हण' निर्मितीप्रक्रिया : अहिराणी बोलीभाषेच्या संदर्भात | डॉ.राजेंद्र पाटील | 409 |
| 80 | व्रतस्थ शिक्षकाचे आत्मनिवेदन : फुलाफुलात चाललो | डॉ. भाऊसाहेब गमे | 412 |
| 81 | वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयीच्या जाणीव जागृतीचा अभ्यास | डॉ.दिपक बाविस्कर | 416 |
| 82 | ७३ वी घटनादुरूस्ती आणि महिला नेतृत्वाचा विकास | सचिन शेवतेकर, डॉ. शरद कुलकर्णी | 421 |
| 83 | اُردو افسانہ میں روایتی موضوعات و ترجیحات | Mohd Abrarulhaq Abdul Zaher Amjad | 427 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदार्भातील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल.*

- मुख्य संपादक, रिसर्च जर्नी

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019), (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Vol. 6, Issue 3
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
July-Aug-Sept. 2019

# महाराष्ट्र पोलीस दलाचा विकास आणि प्रशासकीय रचना - एक अध्ययन

**प्रा. एन. आर. हुरगूळे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.
मो.९८८१९४१३२९

**प्रा. डॉ. आर. एम. भिसे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, भोकर, जि. नांदेड.

**प्रस्तावना**

प्रत्येक घटक राज्याची स्वतंत्र पोलीस यंत्रणा आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था कायम करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. राज्य सरकारने हि जबाबदारी पार पाडण्यासाठी राज्य स्तरावर स्वतंत्र 'गृह विभाग' स्थापन केला आहे. गृह विभागाचा प्रमुख एक कॅबिनेट दर्जाचा मंत्री असतो. त्या मंत्र्याला गृह मंत्री म्हणुन ओळखले जाते. गृहमंत्र्याला त्याच्या कार्यात मदत करण्यासाठी आवश्यकतेनुसार गृह राज्यमंत्री आणि उप गृहमंत्री असतात. राज्यातील गृह विभागाला म्हणजे गृह मंत्र्याला आवश्यक तो सल्ला देणे, मदत करणे आणि त्याने घेतलेल्या निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी एक प्रशासकीय प्रमुख असतो. त्याला गृहसचिव म्हणून ओळखले जाते.[१] त्याच्या मदतीस उपसचिव, सहाय्यक सचिव, संयुक्त सचिव व इतर प्रशासकीय कर्मचारी वर्ग असतो.गृह विभागात राजकीय प्रमुख म्हणुन 'गृहमंत्री' तर प्रशासकीय प्रमुख म्हणुन 'गृहसचिव' हे कार्य करतात. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी राज्यशासनाने गृह विभागातंर्गत स्वतंत्र पोलीस दलाची निर्मिती केली आहे. 'पोलीस' हा विषय राज्य सुचित समाविष्ठ असण्याने पोलीस प्रशासनावर गृह विभागाचे नियंत्रण असते.

**शोधनिबंध लेखनाचा उद्देश**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

१. महाराष्ट्र पोलीस दलाचा इतिहास जाणुन घेणे.
२. महाराष्ट्र पोलीस दलाच्या प्रशासकीय रचनेचा अभ्यास करणे.

**महाराष्ट्र पोलीस प्रशासनाच्या विकासाचे कालखंड**

भारताच्या पोलीस प्रशासानाच्या इतिहासाशी मिळता जुळता इतिहास महाराष्ट पोलीस प्रशासनाचा आहे. तो तीन कालखंडात विभाजीत करण्यात आला आहे. त्यात १) प्राचिन कालखंड २) ब्रिटीश कालखंड ३) स्वातंत्र्योत्तर कालखंड या तीन कालखंडाचा आढावा घेणे अगत्याचे ठरते. पोलीस प्रशासनाच्या इतिहासात गतकालीन कार्यक्षम विस्कळीत दलापासुन ते उत्क्रांत, सुसंघटीत आणि शिस्तबध्द दलात समावेश होतो.[२]

**प्राचीन कालखंड**

प्राचीन भारतात जमीनदारी पध्दत अस्तीत्वात होती. जमीनदार आपल्या पदरी काही सैनीक बाळगत असे. या सैनिकाच्या मदतीने जमीनदार हा गुन्हेगार शोधणे, चोरी गेलेली संपत्ती शोधुन काढण्याचे कार्य करत असत. त्या काळात जनतेच्या चोरी गेलेल्या संपत्तीची भरपाई करुन देण्यास जमीनदार हा बांधील असे. ग्राम पातळीवर शांतता व सुव्यवस्था राखणे हि संपुर्ण जवाबदारी गावाची होती. जरी गुन्हेगार दुसऱ्या गावातील असेल तर त्याचा शोध घेण्याचे कार्य हा ग्रामप्रमुख आपल्या सहकाऱ्याच्या मदतीने करत असे. त्याच बरोबर काही पहारेकरी ग्रामप्रमुखाला या मदत करत असत. त्यांचे मुख्य कार्य म्हणजे रात्रीची गस्त घालणे, व्यक्तीचा आगमनाची सुचना ग्राम प्रमुखास देणे, गुन्हा शोधुन काढणे हि कार्य त्यास करावी लागत. जर एखाद्या चोरी प्रकरणामध्ये चोरी गेलेला ऐवजी सापडला नाही तर त्यांच्यावर सोपवलल्या कामाची जबाबदारीच्या प्रमाणात त्यांना भरपाई करुन द्यावी लागत असे. ब्रिटीशांनी त्यांचा व्यापार मुंबई शहरापासुन सुरु केला व तो हळु हळु कलकत्ता, मद्रास ईत्यादी ठिकाणी विस्तारीत केला. इ.स. १६७४

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

मध्ये त्यांनी बंगालमध्ये दिवाणी सत्ता हस्तगत केली आणि त्यांच्या असे लक्षात आले की, त्यांच्या अधिकारात असलेल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था असणे आवश्यक आहे. त्यांच्या प्रदेशावर जमीनदार आणि ग्रामप्रमुख यांनी दरोडे टाकण्यास व लुटमार करण्यास सुरवात केली होती. हि लुटमार थांबवण्यासाठी त्यांनी १७७२ मध्ये ब्रिटीशांनी एक अधिनियम संमत केला आणि त्या नुसार फौजदारी न्यायालयाची स्थापना केली. याच अनुषंगाने इ.स. १८१३ मध्ये इस्ट इंडिया कंपनीच्या संचालकाने एक समिती स्थापन केली. या समितीने ब्रिटीश सरकारकडे अशी शिफारस केली की, पोलीस प्रशासनाचे नियंत्रण जिल्हा न्यायाधिशाकडुन जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवले जावे. या बदलाचा विपरीत परिणाम होउन राज्यात कायदा व सुव्यस्था ढासळली. विशेषत: दरोडयाचे प्रमाण फार मोठया प्रमाणात वाढले होते.

पोलीस प्रशासन आणि सरकार यामध्ये वरील प्रमाणे सुधारणेचे प्रयोग चालु असतांना महाराष्ट्रात मात्र मुंबई सोडली तर इतर भाग ब्रिटीशांपासुन दुर होता. दख्खनचा कमिश्नर म्हणुन एल्फिन्स्टन या ब्रिटीश अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली. मराठयाच्या प्रशासनावर एक विस्तृत अहवाल लिहुन एल्फिन्स्टनने हा अहवाल कलकत्ता सरकारला सादर केला. या अहवालामध्ये त्याने मराठा प्रशासनाने काही प्रमूख वैशिष्टयांचे वर्णन केले होते. त्यात काही बदल सुचवले होते. या अहवाला नुसार मराठयांची पोलीस प्रशासन व्यवस्था १७ व्या शतकातील पोलीस प्रशासनाशी मिळती-जुळती होती असे दिसते. त्या वेळी गावपातळीवर प्रत्येक ठिकाणी एक पहारेकरी नेमलेला असे आणि त्या पहारेकऱ्यावर गावातील पाटलाचे नियंत्रण ठेवलेले असे. या पहाटेकराचा मोबदला पाटलाला दिलेल्या इनामी जमीनीतुन वजा केला जात असे. या पहारेकऱ्याचे लोक सहाय्यक म्हुणुन रामोशी आणि भिन्न जमातीचे लोक राहत असत. गावाच्या संरक्षणासाठी असलेल्या दलाची जबाबदारी एका प्रमुखावर राहत असे आणि त्याला नाईक असे म्हटले जात असे. ग्राम संरक्षणाच्या संदर्भात विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या गावचा पाटील नाईकाकडे सोपवत असत.

या कालखंडात गुन्हा शोधण्यासाठी पुढील प्रमाणे यंत्रणा अस्तित्वात होती. संपत्तीची चोरी झाल्यास त्या गावातील महार किंवा रामोसी यास जबाबदार धरले जात असे. जर गंभीर स्वरुपाचा दरोडा किंवा त्या सारखा गुन्हा घडला तर जवळच्या किल्लेदाराकडे असलेल्या शिबंदीस पाचारण केले जात असे. प्रत्येक परगण्यामध्ये शिबंदीवर नियंत्रण ठेवण्याचे काम मामलेदार करत असे. ज्या विभागात त्या फौजेची गरज भासली त्या विभागातुन कर गोळा करुन त्या फौजेचा खर्च भागवलया जात असे. त्यांचे मुख्य कार्य म्हणजे गावपातळीवरच्या पोलीसाला सहाय्य करणे. सशक्त दलाच्या सहाय्याने हिंसाचार थांबवणे असे होते. गुन्हयाचा शोध घेण्याचे कार्य त्या काळात रामोशावर सोपविलेले असायचे. शिबंदी हे यात्रा, उत्सव या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक पोलीसांना मदत करत असत.

दुसरा बाजीराव पेशव्याच्या काळात जिल्हा पोलीस यंत्रणेमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या. त्यात 'तपासनवीस' नावाचा एक अतिरिक्त पोलीस अधिकारी नेमण्यात आला या अधिकाऱ्याकडे गुन्हे शोधणे आणि गुन्हेगारांना पकडणे ही जबाबदारी सोपवण्यात आली. हा अधिकारी मामलतदारापासुन स्वतंत्र तसेच महसुली पोलीसापेक्षा वेगळा होता.

शहरी विभागामध्ये न्यायदंडाधिकाऱ्याचे अधिकार कोतवालाकडे होते. त्याच बरोबर कोतवाल हा नागरी सोयी-सुविधा पाहत असे. शहरात वस्तुंच्या मालाच्या किमंतीवर नियंत्रण ठेवणे, शहरातील लोकसंख्येची गणना करणे, संपत्तीच्या संदर्भातील वाद मिटविणे, सटबाज किंवा व्यावसायिक जुगाऱ्यांकडुन कर वसुल करणे. या सारखी कार्य शहर कौतवाल त्या वेळी करीत असे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नमुद केल्याप्रमाणे नागरगडचे सर्व अधिकार तयास बहाल केलेले असत. त्याच प्रमाणे त्याला स्वत:च्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असत.[३]

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**ब्रिटीश कालखंड**

इ.स. १८१८ मध्ये पेशव्यांचा पाडावा झाला आणि व्यापक भुप्रदेश ब्रिटीशांच्या अधिपात्यखाली आला. बंगाल प्रमाणे जिल्हावार प्रांतरचना ब्रिटीशांनी महाराष्ट्रात केली. पेशव्याच्या कालखंडात मामळतदार आणि तपासनविस तसेच कमाविसदार हे त्या-त्या विभागाचे प्रमुख मानले जात असत. मामळतदार आणि तपपासनविस तसेच कमाविसदार आणि पोलीस आस्थापनेचे व्यवस्थापन करणे फौजदारी गुन्हे नोंदवणे यासारखी इतर कार्य देखील मामलतदार त्या वेळी करत असत.[४]

ईस्ट इंडीया कंपनीने गावपातळीवरील पोलीस व्यवस्था कायम ठेवली आणि सुधारणेचा एक भाग म्हणुन पोलीस यंत्रणेचे नियंत्रण जिल्हाधिकाऱ्याकडे सापेपवले. प्रत्येक जिल्हयाची वेगवेगळया मंडळामध्ये विभागणी करुन त्याचा कार्यभार 'दरोगा' किंवा मुख्य पोलीस अधिकारी यांच्याकडे सोपविला जात असे. दरोगाच्या हाताखाली ३० शस्त्रधारी कर्मचाऱ्यांचा ताफा असे व तसेच तो गाव पातळीवरील पोलीस दलाचा अधिकारी म्हणुन देखील काम करीत असे. अशा प्रकारची पोलीस यंत्रणा इ.स. १८४८ पर्यंत भारतात टिकुन होती. नंतर मात्र तिच्यात बदल करण्यात आला कारण अशा प्रकारची सेवा अपुरी पडु लागली. तसेच या यंत्रणे मार्फत जनक्षोभ कमी करणे जमले नाही आणि संपुर्ण जनक्षोभाच्या संपुर्ण दमनासाठी ही यंत्रणा अपुर्ण वाटत होती.[५]

इ.स. १८४३ मध्ये सर चार्ल्स नॅपिअर अधिकाऱ्याने सिंध प्रांतामध्ये सुधारणा करतांना 'रॉयल आयरिश कॉन्स्टेवुलरी' हि पोलीस यंत्रणा आदर्श नमुना म्हणुन स्विकारली. त्यावेळी आस्तीत्वात आसलेल्या पोलीस यंत्रण पेक्षा हि यंत्रणा वेगळी होती. या यंत्रणेवर मामलतार किंवा जिल्हाधिकाऱ्याचे नियंत्रण नव्हते. हि यसंत्रणा एखादया कार्याचा अहवाल सरळ गव्हर्नरकडे देत असे. परंतु त्यावेळी हि पध्दत असमाधानकारक वाटु लागल्याने इ.स. १८४४ मध्ये या पोलीस प्रशासनाचा कार्यभार तुरुंगाधिकारी आणि पोलीस आयुक्त अशा प्रकारची कामे करणाऱ्या अधिकाऱ्याकडे वर्ग करण्यात आली.[६]

इ.स. १८९० मध्ये मुंबई पोलीस कायदा पास करण्यात आला आणि मुंबई जिल्हा पोलीस अधिनियमात दुरुस्ती करण्यात आली, नंतर हळू-हळू ही पध्दती बंद करण्यात आली, कारण यावर आक्षेप घेतला जात होते.[७]

इ.स. १९१४ ते इ.स. १९४६ हा कालखंड पोलीस प्रशासनासाठी अतिशय ताण-तणावाचा कालखंड माणला जातो. कारण याच कालखंडात पहिले आणि दुसरे महायुध्द होउन गेले. या काळात भारतात सुरु असलेल्या विविध राजकिय चळवळी हे सुध्दा ताण-तणावातील आणखी एक महत्वाचे कारण होते. इ.स. १९२० मध्ये सुरु झालेली असहकार चळवळ, इ.स. १९३० मध्ये घडलेली सविनय कादेभंग चळवळ आणि इ.स. १९४२ मध्ये सुरु झालेले भारत छोडो आंदोलन या सार्‍या चळवळींनी आणि घटकांनी ब्रिटीश साम्राज्याचा पाया हादरुन गेला होता. या वेळा पर्यंत महाराष्ट्र पोलीस प्रशासनाची यंत्रणा खालील प्रमाणे होती.

१) पोलीस महासंचासलक ०१
२) पोलीस उपमहासंचालक ३
३) जिल्हा पोलीस अधिक्षक ३१
४) जिल्हा पोलीस उपअधिक्षक ४०
५) पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक १६४
६) हेड कॉन्स्टेबल व कॉन्स्टेबल[८] ३२२५१

**स्वातंत्र्योत्तर कालखंड**

भारतातील पोलीस यंत्रणेत स्वातंत्र्य पुर्व कालखंड ात अधिकारी पदावर ब्रिटीश काम करत होते. परंतु या मुळे अधिकाऱ्यांची फार मोठया प्रमाणात कमतरता भासू लागली. त्या मुळे कनिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

भारतीय अधिकाऱ्यांना बदली देउन वरिष्ठ पातळीवरील रिक्त पदे भरण्यात आली. तया वेळी हे अधिकारी नविन असले तरीही त्यांना दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात यशस्वी ठरले. महात्मा गांधीजीच्या हत्येनंतर देशातील निर्माण झालेली अराजकाची परिस्थिती या अधिकाऱ्यांनी सक्षमतेने हाताळली. याच काळात म्हणजेच इ.स. १९४८ व १९४९ या वर्षात अनेक संस्थाने भारतात विलीन करण्यात आली. या कामी सुध्दा पोलीस यंत्रणेवर फार मोठया कामाचा ताण पडला होता. ही परिस्थीती सुध्दा त्यांनी व्यवस्थित हाताळली होती.

मुंबई राज्य पोलीस प्रशासनाच्या संदर्भात आपली वेगळी ओळख सुरुवातीपासुन ठेवत आले होते. या वेळी देखील त्यांची कामगीरी वाखाणण्याजोगी होती.

स्वांतत्र्यानंतर सुध्दा कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची जवाबदारी पोलीस प्रशासनावरच होती. त्यासाठी ची त्यांची रचना व कार्य पुर्वि प्रमाणेच सुरु होते. त्यांचे पांरपारिक मुल्य आदर्श, संपुर्ण जपणे आवश्यक होते, म्हणुन इ.स. १९५१ मध्ये मुंबई पोलीस कायदा १९०२ रदद बातल करुन त्या ऐवजी मुंबई पोलीस कायदा १९५१ निर्माण केला गेला. या कायदयानुसार संपुर्ण मुंबई राज्यासही एकच पोलीस दल ठेवण्यात आले आणि पोलीस प्रशासनाचा प्रमुख म्हणुन पोलीस महानिरिक्षक यांची नियुक्ती केली गेली आणि त्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार देण्यात आले.[९]

इ.स. १९५६ मध्ये भाषावार प्रांतरचना करण्यात आली. त्यानुसार मुंबई प्रांताचे जिल्हे म्हैसुर राज्यात गेले. त्या मध्ये बेळगाव, बिजापुर, धारवाडा आणि कारवाड यांचा समावेश होता. त्यांच्या बदल्यात हैद्राबाद राज्यातील औरंगाबाद, परभणी, नांदेड, बिड आणि उस्मानाबाद हे जिल्हे म्हणजेच मराठवाडा मुंबई राज्याला जोडण्यात आला. त्या नंतरच्या काळात राज्याचे सहा विभाग करण्यात आले. या सहा विभागात पोलीस उपमहानिरिक्षक नेमण्यात आले.

१ मे १९६० रोजी द्विभाषिक मुंबई राज्याची विभागणी होउन महाराष्ट्र आणि गुजरात वेगळे झाले. त्यावेळी महाराष्ट्राची विभागणी २९ जिल्हात करण्यात आली. या जिल्हयासाठी चार विभाग स्थापन करण्यात आले. त्यात औरंगाबाद, नागपुर, पुणे, आणि मुंबई यांचा समावेश होता.

भारतात प्रत्येक घटक राज्याची स्वतंत्र पोलीस यंत्रणा आहे. तशी महाराष्ट्रात सुध्दा स्वतंत्र पोलीस यंत्रणा अस्तित्वात आहे. या पोलीसाची स्वतंत्र ओळख व्हावी यासाठी महाराष्ट्र पोलीस दलाचा स्वतंत्र मोनोग्राम (लोगो) स्विकारण्यात आला आहे.

**राज्य पोलीस दलाचा ध्वज**

महाराष्ट्र पोलीस दलासाठी स्वतंत्र ध्वज आहे. ०२ मे १९६१ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्री पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते महाराष्ट्र पोलीस दलाला हा ध्वज प्रदान करण्यात आला.[१०] या ध्वजाचा रंग गडद निळा आहे. ध्वजा सभोवती पांढऱ्या रेशमी कापडाची किनार असुन मध्यंतरी एक तारा आहे. ताऱ्याच्या मध्यंतरी एकात एक दोन संरक्षणात्मक वर्तुळ आहेत. वर्तुळामध्ये हाताचा पंजा असुन ताऱ्याच्या खालच्या बाजूस सदरक्षणय खालनिग्रहणाय हे ब्रिद वाक्य लिहिलेले आहे. या ध्वाजाची लांबी ८-१/२ फुट व रुंदी ४-१/२ फुट आहे. सदर ध्वजावरील चिन्हाचा अर्थ खालील प्रमाणे आहे.

अ) पंचकोणीतारा - हे पोलीसांचे पांरपारीक चिन्ह आहे.

ब) दोन वर्तुळाकार ढाली - हे संरक्षकाचे प्रतिक आहे.

क) हाताचा पंजा - हे अभय दर्शविते.

ड) सदरक्षणाय - हे सज्जनांचे व चांगल्या गोष्टीचे रक्षण करते.

इ) खालनिग्रहणाय - दुष्ट व वाईट गोष्टींचा न्यायनिवाटा करणे, समुल नष्ट करणे.

**महाराष्ट्र पोलीस दलाची रचना**

महाराष्ट्र पोलीस दलाची रचना खालील प्रमाणे आहे.

१) आर. पी. सी. :- रिक्रुट पोलीस कॉन्स्टेबल

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

२) पोलीस कॉन्स्टेबल (पी.सी.) :- पोलीस कॉन्स्टेबल
३) एन. पी. सी. :- नाईक पोलीस कॉन्स्टेबल
४) एच. सी. :- हेड कॉन्स्टेबल
५) आर. ए. एस. आय :- रिझर्व असिस्टंट पोलीस सबइन्सपेक्टर
ए. एस. आय. :- असिस्टंट सबइन्सपेक्टर
६) ए. पी. एस. आय. :- असिस्टंट पोलीस सबइन्सपेक्टर
ए. आर. एस. आय. :- असिस्टंट रिझर्व सबइन्सपेक्टर
७) ए. पी. आय. :- असिस्टंट पोलीस इन्सपेक्टर
पी. आय. :- पोलीस इन्सपेक्टर
८) डी. वाय. एस. पी. :- डेप्युटी सुपरिटेंडेन्ट ऑफ पोलीस
९) ए. एस. पी. :- ॲडिशनल सुपरिटेडेन्ट ऑफ पोलीस
१०)एस. पी. :- सुपरिटेडेन्ट ऑफ पोलीस
११) ए. आय. जी. पी. :- असिस्टंट इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस
१२)डी. आय. जी. :- डेप्युटी इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस
१३)ॲडिशनल सी. पी. :- ॲडिशनल कमिशनर ऑफ पोलीस
१४) आय. जी. पी. :- इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस
१५) स्पेशल आय. जी. पी. :- स्पेशल इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस
१६)जॉईंट सी. पी. :- सह पोलीस आयुक्त
१७) सी. पी. :- कमिशनर ऑफ पोलीस
१८) स्पेशल डी. जी. :- स्पेशल डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस
१९) ॲडीशनल डी. जी. :- ॲडीशनल डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस
२०) डी. जी. :- डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस ( पोलस महासंचालक )[११]

**महाराष्ट्र पोलीस दलाचे विभाग**

संपुर्ण महाराष्ट्र राज्यात पोलीसांना त्यांचे कर्तव्य व्यवस्थित पार पाडाता यावे. त्याच बरोबर कार्यात एक प्रकाराची सुसूत्रता निर्माण व्हावी, कायदा व सुव्यवस्था राखणे सोईचे व्हावे, गुन्हेगारीवर वेळीच नियंत्रण मिळवता यावे या उध्देशाने महाराष्ट्रात पोलीस प्रशासनात १४ विभाग निर्माण करण्यात आले आहेत. यातील सात विभागास पोलीस आयुक्त विभाग व सात विभागास पोलीस परिक्षेत्र असे म्हणतात.

**अ) महाराष्ट्रातील पोलीस आयुक्त विभाग**

१) पोलीस आयुक्त विभाग, बृहन्मुंबई
२) पोलीस आयुक्त विभाग, ठाणे
३) पोलीस आयुक्त विभाग, पुणे
४) पोलीस आयुक्त विभाग, नाशिक
५) पोलीस आयुक्त विभाग, नागपुर
६) पोलीस आयुक्त विभाग, औरंगाबाद
७) पोलीस आयुक्त विभाग, सोलापुर

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**ब) महाराष्ट्र राज्यातील पोलीस परिक्षेत्र**

**अ) पोलीस परिक्षेत्र नाशिक**

१) नाशिक जिल्हा
२) जळगाव जिल्हा
३) धुळे जिल्हा
४) अहमदनगर जिल्हा

**ब) पोलीस परिक्षेत्र अमरावती**

१) अमरावती जिल्हा
२) बुलढाणा जिल्हा
३) यवतमाळ जिल्हा
४) भुसावळ जिल्हा

**क) पोलीस परिक्षेत्र नागपुर**

१) नागपुर जिल्हा
२) वर्धा जिल्हा
३) भंडारा जिल्हा
४) चंद्रपुर जिल्हा
५) नंदुरबार जिल्हा

**ड) पोलीस परिक्षेत्र औरंगाबाद**

१) औरंगाबाद जिल्हा
२) जालना जिल्हा
३) बीड जिल्हा
४) उस्मानाबाद जिल्हा

**इ) पोलीस परिक्षेत्र कोल्हापुर**

१) कोल्हापुर जिल्हा
२) पुणे जिल्हा
३) बीड जिल्हा
४) सांगली जिल्हा
५) सोलापुर जिल्हा

**ई) पोलीस परिक्षेत्र ठाणे**

१) ठाणे जिल्हा
२) रत्नागिरी जिल्हा
३) सिंधुदूर्ग जिल्हा
४) रायगड जिल्हा

**उ) पोलीस परिक्षेत्र नांदेड**

१) नांदेड जिल्हा

PRINCIPAL
Shivaji College, HINGOL

२) हिंगोली जिल्हा
३) परभणी जिल्हा
४) लातुर जिल्हा.[१२]

वरील प्रमाणे पोलीस दलाचे विभाजन करुन कार्यामध्ये एक प्रकारची सुसुत्रता निर्माण केली आहे.

**निष्कर्ष**

१. भारताच्या पोलीस प्रशासानाच्या इतिहासाशी मिळता जुळता इतिहास महाराष्ट पोलीस प्रशासनाचा आहे.
२. मुंबई राज्य पोलीस प्रशासनाच्या संदर्भात आपली वेगळी ओळख सुरुवातीपासुन ठेवत आले आहे.
३. महाराष्ट्र पोलीस दलाचा स्वतंत्र मोनोग्राम (लोगो) स्विकारण्यात आला आहे.
४. महाराष्ट्रात पोलीस प्रशासनात १४ विभाग निर्माण करण्यात आले आहेत.

**सारांश**

स्वातंत्र्यानंतरच्या काळखंडात भारतीय राज्यघटने प्रमाणे पोलीस यंत्रणा केंद्रसरकार व राज्यसरकार या दोन्ही सरकारच्या अधिपात्याखाली ठेवण्यात आली. कायदा व सुव्यवस्था, रेल्वे पोलीस आणि गाव पोलीस हे विषय राज्य सरकारकडे सोपवण्यात आले. पोलसांचा घटनात्मक दर्जा पुर्विप्रमाणेच ठेवण्यात आला होता. विक्रेंदीत पोलीस प्रशासन पध्दती नियंत्रणासाठी योग्य राहिल या दृष्टिने घटनाकारांनी ती विकंद्रीत ठेवली होती. राज्यघटनेने घटक राज्यांना पोलिस कार्यावर नियंत्रण आणि नियमन ठेवण्यासाठी विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत. पोलीस दल संघटनेसंदर्भात भारताच्या विविध राज्यात वेगवेगळी पध्दती अस्तित्वात आहे. जाणीवपुर्वक अशी व्यवस्था ठेवलेली आहे. पोलीस प्रशासनाच्या बाबतीत केंद्रसरकारची भुमिका महत्वाची मानली जाते. वास्तविक घटक राज्यामध्ये एकसंघ असा पोलीसांचा साचा निर्माण करणे हे केंद्र सरकारचे काम आहे.

**संदर्भ सुची**

१) Shah, Giriraj.,(1999),"History and organization of Indian Police", New Delhi, Amol Publications, Pvt. Ltd, 162-163
२) Ghosh, S. K., Rustumji, K.F., (1993), "Encyclopedia of Polic in India", Vol- I, New Delhi,Ashish Publishing house,318
३) Ghosh, S. K., Rustumji, K.F., (1993), "Encyclopedia of Polic in India", Vol- I, New Delhi,Ashish Publishing house,320
४) Ghosh, S. K., Rustumji, K.F., (1993), "Encyclopedia of Polic in India", Vol- I, New Delhi,Ashish Publishing house,322
५) Shah, Giriraj.,(1999),"History and organization of Indian Police", New Delhi, Amol Publications, Pvt. Ltd,82
६) Shah, Giriraj.,(1999),"History and organization of Indian Police", New Delhi, Amol Publications, Pvt. Ltd,140
७) Ghosh, S. K., Rustumji, K.F., (1993), "Encyclopedia of Polic in India", Vol- I, New Delhi,Ashish Publishing house,327
८) Ghosh, S. K., Rustumji, K.F., (1993), "Encyclopedia of Polic in India", Vol- I, New Delhi,Ashish Publishing house,327
९) निलेवाड., देशमुख., कुरणे.,(२०००), पोलीस मार्गदर्शिका, मुंबई, विहेतुक प्रकाशन,९,१०
१०) निलेवाड., देशमुख., कुरणे.,(२०००), पोलीस मार्गदर्शिका, मुंबई, विहेतुक प्रकाशन,४२,४३
११) निलेवाड., देशमुख., कुरणे.,(२०००), पोलीस मार्गदर्शिका, मुंबई, विहेतुक प्रकाशन,३२,३४
१२) निलेवाड., देशमुख., कुरणे.,(२०००), पोलीस मार्गदर्शिका, मुंबई, विहेतुक प्रकाशन,३२,३४

PRINCIPAL
Shivaji College, Hingoli